॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १

श्रीगणेशाय नमः॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः॥

मी श्रीगणेशाला नमस्कार करतो. मी श्रीसरस्वतीला नमस्कार करतो. मी श्रीगुरुंना नमस्कार करतो.

ओवी :

नामधारक भक्तासी। सिद्ध सांगे विस्तारेसीं।
अवतार झाले मानुषीं। भक्तजन तारावया॥ १ ॥

गद्यरुप :

सिद्धमुनी नामधारक भक्ताला विस्तारुन सांगू लागला,"ह्या मनुष्यलोकात भक्तजनांना तारण्यासाठी अवतार झाले."

शब्दार्थ :
मानुष=मनुष्य

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २

ओवी :

ऐक भक्ता नामधारका। अंबऋषीकारणें विष्णु ऐका।
अंगिकारले अवतार देखा। मानुषीं नाना रुप घेतसे॥ २॥

गद्यरुप :

भक्ता नामधारका, विष्णुने अंबऋषीसाठी अवतार पत्करले (अध्याय ३मधील) हे पाहिलेस, (तसेच) मनुष्याची नाना रुपे घेतली ती ऐक.

शब्दार्थ :		
कारणे= साठी	अंगिकारणे =पत्करणे	मानुष=मनुष्य

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३

ओवी :

मत्स्य कूर्म वराह देख। नराचें देह सिंहाचें मुख।
वामनरुप झाला भिक्षुक। झाला ब्राह्मण क्षत्रियकर्मी ॥ ३ ॥

गद्यरुप :

"मासा,कासव,डुक्कर,माणसाचा देह व सिंहाचे तोंड (असलेला नृसिंह), वामनरुपातला भिक्षुक, क्षत्रियकर्म करणारा ब्राह्मण (भगवान परशुराम) हे (अवतार) पहा."

शब्दार्थ :		
मत्स्य= मासा	कूर्म= कासव	वराह= डुक्कर

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४

ओवी :

दशरथकुळीं जन्म। प्रख्यात अवतार श्रीरघुराम।
राजा होऊनि मागुती जन्म। गौळियां घरीं गुरें राखी॥४॥

गद्यरुप :

दशरथ कुळात जन्म घेतलेला प्रख्यात अवतार श्रीरघुराम, (मागील जन्मात) राजा (श्रीरघुराम) होऊन, (नंतरच्या जन्मात) गवळ्याच्या घरी गुरे राखणारा (श्रीकृष्ण),

शब्दार्थ :
मागुता = मागील

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५

ओवी :

वस्त्रें फेडूनि झाला नग्न। बौद्धरुपी झाला आपण।

होऊनि कलंकी अवतार जाण। तुरंगारूढ काय आवडी॥५॥

गद्यरुप :

वस्त्र दूर करुन बौद्ध रुपात आपण (विष्णु)अवतार झालात, घोडीवर आरुढ होऊन कलंकी अवतार घेण्यात (विष्णुला) काय आवडले ? (असेल हे) जाण.

शब्दार्थ :		
फेडणे = दूर करणे	आवडी=आवड	तुरंग=घोडी

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६

ओवी :

नाना प्रकारें नाना वेष। अवतार धरी हृषीकेश।
तारावया साधु मानुष। दुष्टनिग्रह करावया॥ ६ ॥

गद्यरुप :

साधु पुरुषांना तारण्यासाठी, दुष्टांचा अटकाव करण्यासाठी नाना प्रकारचे वेष व नाना अवतार हृषीकेशाने (श्रीविष्णुने)धारण केले.

शब्दार्थ :	
मानुष=मनुष्य	निग्रह= अटकाव
साधु =शमदमादी = शमदम(मनःसंयमन) + आदि गुणांनी युक्त शमः = शांती (अंतःकरणाचा निग्रह करणे) दमः = इंद्रियांचे दमन करणे	
हृषीकेश = हृषिकम् म्हणजे ज्ञानाचे इंद्रिय. अशा त्या पाच ज्ञानेन्द्रियांचा स्वामी, तो हृषीकेश म्हणजे भगवान श्रीकृष्ण= श्रीविष्णुचा अवतार	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७

ओवी :

द्वापर जाऊनी जाहला कली। अज्ञान लोक ब्राह्मणकुळीं।
आचारहीन होऊनि प्रबळीं। वर्तती, महिमा कलियुगीं॥ ७॥

गद्यरुप :

द्वापर(युग) जाऊन कली(युग) प्रखरपणे दिसू लागले. ब्राह्मणकुळातील अज्ञानी लोक आचारहीन होऊन प्रबळ झाले, कलियुगात आपण मोठे आहोत असे वागू लागले.

शब्दार्थ :	
जाहली (हिंदी स्त्री लिंगी शब्द)= प्रखरपणा	प्रबळ= बलिष्ठ
वर्तणे =वागणे	महिमा= मोठेपणा

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ८

ओवी :

भक्तजनरक्षणार्थ। अवतरला श्रीगुरुनाथ।
सगरांकारणें भगीरथ। आणी गंगा भूमंडळीं॥८॥

गद्यरुप :

भक्तजनाच्या रक्षणासाठी श्रीगुरुनाथाने अवतार घेतला. सगर (राजा) साठी भगीरथ (राजा)ने गंगा पृथ्वीवर आणली.

शब्दार्थ :
भूमंडळ=भू(जमीन) +मंडळ (गोल)= जमीनीचा गोल=पृथ्वी

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ९

ओवी :

तैसी एक विप्रवनिता। आराधिलें श्रीविष्णु-दत्ता।

तिचे उदरीं अवतार धरितां ।आश्चर्य झालें परियेसा॥९॥

गद्यरुप :

त्याच प्रकारे एका ब्राह्मण स्त्रीने श्रीविष्णु - दत्ताची (श्रीविष्णुचा अवतार श्रीदत्त) आराधना केली. तिच्या पोटी अवतार झाला (जन्माला आला) हे आश्चर्य झाले, ते ऐका .

शब्दार्थ :	
तैसा= त्या प्रकारचा	आराधना= प्रार्थना पूजा
विप्र= ब्राह्मण	वनिता= स्त्री
उदर= पोट	परियसणे = ऐकणे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १०

ओवी :

‘पीठापूर’ पूर्वदेशीं। होता ब्राह्मण उत्तमवंशी।
आपस्तंब शाखेसी। नाम ‘आपळराज’ जाण॥ १०॥

गद्यरुप :

पूर्व(दिशेच्या) देशात ‘पीठापूर’ गावी, उत्तमवंशातला आपस्तंब शाखेतील, ‘आपळराज’ नावाचा ब्राह्मण होता, हे जाण.

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ११

ओवी :

त्याची भार्या नाम 'सुमता'। असे आचार पतिव्रता।
अतिथि आणि अभ्यागता। पूजा करी भक्तिभावें॥ ११ ॥

गद्यरुप :

त्याच्या पत्नीचे नांव 'सुमता' होते. तिचे वर्तन पतिव्रतेचे होते. ती अतिथि आणि पाहुणा यांची भक्तिभावाने पूजा करीत असे.

शब्दार्थ :	
भार्या=पत्नी	आचार= वर्तन
अतिथि= भोजनसमयी आलेला आगंतुक पाहुणा अ + तिथि = म्हणजे अकाली तसेच न पूर्वसूचना देता येणारा पाहुणा	
अभ्यागत =पाहुणा अभ्यागता (अभि + आ + गम् + क्त = अचानक जवळ आलेली व्यक्ति)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १२

ओवी :

ऐसें असतां वर्तमानीं। पतिसेवा एक मनीं।
अतिथिपूजा सगुणी। करी निरंतर परियेसा॥ १२॥

गद्यरुप :

असा तिचा वर्तमान काळ चालू असताना , तिच्या मनात पतिसेवा होती व ती अतिथींचीसुद्धा सगुणी पूजा निरंतर करीत असे, हे ऐका.

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १३

ओवी :

वर्ततां ऐसें एके दिवशीं। आला दत्त अतिथिवेषीं।
श्राद्ध होतें अमावास्येसी। तया विप्राघरीं देखा॥ १३॥

गद्यरुप :

असे चालू असताना, एके दिवशी दत्त अतिथी वेषात आला. त्या दिवशी अमावस्या असून त्या ब्राह्मणाच्या घरी श्राद्ध होते, हे त्याने पाहिले.

शब्दार्थ :	
वर्तन= चाल	विप्र=ब्राह्मण
श्राद्ध= मृत पितरांच्या उद्देशाने तत्प्रीत्यर्थ पिंडदान, ब्राह्मणभोजन इ. केलेले कर्म	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १४

ओवी :

न जेवितां ब्राह्मण घरीं। दत्तात्रेया भिक्षा घाली ते नारी।
दत्तात्रेय साक्षात्कारी। प्रसन्न झाला तये वेळीं॥ १४॥

गद्यरुप :

ब्राह्मणाच्या घरी (कोणीही) जेवले नव्हते, तरी तिने (सुमताने) दत्तात्रेयाला भिक्षा घातली. त्यावेळी दत्तात्रेय प्रसन्न झाला, साक्षात्कार घडविला .

शब्दार्थ :
साक्षात्कार= स्वरूपाकाराने दर्शन

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १५

ओवी :

त्रिमूर्तींचें रुप घेऊनी। स्वरुप दाविलें अतिगहनी।
पतिव्रता धरुनि चरणीं। नमन करि मनोभावें॥ १५॥

गद्यरुप :

त्रिमूर्तीचे रुप घेउन अतिगहन स्वरुप दाखविले. पतिव्रतेने त्यांचे चरण धरुन मनोभावे नमस्कार केला.

शब्दार्थ :
गहन=दुर्ज्ञेय= दुः+ज्ञेय= समजण्यास कठीण

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १६

ओवी :

दत्तात्रेय म्हणती तियेसी। माग वो माते जें वांछिसी।
जे जे वासना तुझे मानसीं। पावेल त्वरित म्हणितलें॥ १६ ॥

गद्यरुप :

दत्तात्रेय तिला म्हणाले," हे माते, तू जे इच्छित असशील ते माग." तुझ्या मनात जी जी इच्छा असेल ती लगेच मिळेल, असे ते म्हणाले.

शब्दार्थ :		
वांच्छा= इच्छा	वासना= अव्यक्त आणि अप्रगट इच्छा	मानस= मन

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १७

ओवी :

ऐकोनि स्वामीचें वचन। विप्रवनिता करी चिंतन।
विनवीतसे कर जोडून। नानापरी स्तवोनियां॥ १७॥

गद्यरुप :

स्वामींचे बोलणे ऐकून ती ब्राह्मण स्त्री विचार करु लागली. हात जोडून, नमस्कार करुन, नाना प्रकारे स्तुति करुन विनवू लागली.

शब्दार्थ :			
विप्र= ब्राह्मण	वनिता= स्त्री	कर= हात	परी= प्रकारे
चिंतन= विचार, ध्यास		स्तवणे= स्तुती करणे, प्रशंसा करणे	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १८

ओवी :

जय जया जगन्नाथा। तूं तारक विश्वकर्ता।

माझे मनीं असे आर्ता। पुरवावी ते देवराया॥ १८॥

गद्यरुप :

“हे जय जगन्नाथा, तू विश्वकर्ता असून, तारणारा आहेस. माझ्या मनात उत्कट इच्छा आहे, ती हे देवराया तू पुरवावी.”

शब्दार्थ :
आर्त= उत्कट इच्छा

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक १९

ओवी :

तूं कृपाळू सर्वां भूतीं। वेद पुराणें वाखाणिती।
केवीं वर्णूं तुझी कीर्ति। भक्तवत्सल कृपानिधि॥ १९॥

गद्यरुप :

तू सर्व प्राण्यांच्या (बाबतीत) कृपाळू आहेस, अशी वेद पुराणे तुझी स्तुती करतात. हे भक्त वत्सल, कृपेचा सागरा, तुझी कीर्ति कशी वर्णन करु?

शब्दार्थ :	
भूत= प्राणी	वाखाणणे= स्तुती करणे
केवी= कसे	निधि= सागर

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २०

ओवी :

मिथ्या नव्हे तुझा बोल। जें कां ध्रुवासी दिधलें अढळ।
बिभीषणासी स्थापियलें। राज्यीं लंकाद्वीपींचे॥ २० ॥

गद्यरुप :

तुझे बोल जे आहेत, ते खोटे नाहीत.ध्रुवास अढळ(पद) दिलेस. लंकाद्वीपाचे राज्य देऊन बिभिषणाला गादीवर बसविले.

शब्दार्थ :	
मिथ्या= खोटे	अढळ= अचल, स्थिर

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २१

ओवी :

भक्तजनां तूं आधार। व्हावया धरिसी अवतार।
ब्रीद असे सचराचर। चौदा भुवनांमाझारीं॥ २१ ॥

गद्यरुप :

भक्तजनांचा तू आधार व्हावा म्हणून तू पृथ्वीवर अवतार घेतलास. चौदा भुवनांमधील सजीव निर्जीव सहित सृष्टी हे तुझे चिन्ह आहे

शब्दार्थ :	
धरा =पृथ्वी	माझारी= आत, मध्ये
सचराचर=चर (चल)=सजीव व अचर (चल नसलेली)= निर्जीव, अशा दोन्ही प्रकारांसहित	
ब्रीद= विवक्षित गोष्टीच्या बाण्याचे दर्शक चिन्ह	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २२

ओवी :

आतां मातें वर देसी। वासना असे मानसीं।
नव्हा अन्यथा बोलासी। कृपासिंधु देवराया॥ २२॥

गद्यरुप :

आता मला वर देशील, अशी माझ्या मनात इच्छा आहे. अन्यथा कृपेचा सागर असलेल्या देवराया, तुझ्या बोलण्याचे कौतुक (कसे असेल ?).

शब्दार्थ :		
वर= देणगी, आशीर्वाद	वासना= अव्यक्त आणि अप्रगट इच्छा	मानस=मन
नव्हाळी= गोडी, कौतुक	सिंधु= सागर	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २३

ओवी :

माझे मनींची वासना। तुंवा पुरवावी जगत्रजनना।
अनाथतारका नारायणा। म्हणोनि चरणीं लागली॥ २३ ॥

गद्यरुप :

माझ्या मनातली इच्छा जगाच्या उत्पत्तिकर्त्या तू पुरवावीस. नारायणा, अनाथांच्या तारका असे म्हणून ती पाया पडली.

शब्दार्थ :	
वासना= इच्छा	जगत्र= तीन जगे = स्वर्ग पृथ्वी आणि पाताळ
चरण= पाय	जनन=उत्पत्ती

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २४

ओवी :

ऐकोनि तिचें करुणावचन। संतोषला त्रयमूर्ति आपण।
कर धरुन आश्वासोन । माग जननी म्हणतसे॥ २४॥

गद्यरुप :

तिचे करुण बोल ऐकून त्रिमूर्ति आपण समाधानी झालात. तिचे हात हातात धरुन आश्वासन देऊन म्हणालात,"हे माते तू (वर) माग."

शब्दार्थ :		
जननी= माता	वचन= बोल	संतोषणे= समाधान पावणे, आनंदणे
त्रय= त्रि = तीन		

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २५

ओवी :

तंव बोलिली पतिव्रता। स्वामी जें निरोपिलें आतां।
'जननी' नाम मज ठेवितां। करा निर्धार याचि बोलाचा॥ २५॥

गद्यरुप :

तेव्हा ती पतिव्रता म्हणाली,"स्वामी, तुम्ही आता जो संदेश दिलात, मला जननी (माता) ह्या नावाने संबोधिले, तेच बोल निर्धाराने सार्थ करा".

शब्दार्थ :		
निरोप= संदेश	जननी= माता	निर्धार= निश्चय, नियम

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २६

ओवी :

मज पुत्र झाले बहुत। नव्हती स्थिरजीवित।

जे राहिले असती आतां सजीवित। अक्षहीन पादहीन॥ २६ ॥

गद्यरुप :

मला खूप मुलगे झाले पण ते जन्मतःच मेले. जे जिवंत राहिले ते आंधळे व पांगळे आहेत.

शब्दार्थ :		
स्थिर= शांत	सजीव= जिवंत	पाद=चरण= पाय
अक्ष= (संस्कृत अक्षिन्)=डोळा	पुत्र= मुलगा	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २७

ओवी :

योग्य झाला नाहीं कोणी। काय करावे मूर्ख प्राणी।
असोनि नसती येणे गुणीं । पुत्रावीण काय जन्म ॥ २७ ॥

गद्यरुप :

योग्य असा कोणी झाला नाही, ह्या मूर्ख प्राण्याचे काय करावे ? अशाप्रकारची लक्षणे प्राप्त झालेले पुत्र असूनही नसल्यासारखेच आहेत. पुत्राशिवाय माझ्या जन्माला अर्थ काय?

शब्दार्थ :	
गुण= लक्षण	येणे= प्राप्त होणे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २८

ओवी :

व्हावा पुत्र आम्हां ऐसा। ज्ञानवंत परमपुरुषा।
जगद्वंद्य देवसदृशा। तुम्हांसारिखा मज आतां॥ २८॥

गद्यरुप :

हे जगात वंदनीय, देवासारख्या, ज्ञानवंत परमपुरुषा, आम्हाला तुमच्यासारखा पुत्र व्हावा.

शब्दार्थ :	
जगद्वंद्य= जगत् (जगात)+वंद्य (वंदनीय)	सदृश= सारखा

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक २९

ओवी :

ऐकोनि तियेचें वचन। प्रसन्न झाला दत्त आपण।
पुढें असे कार्याकारण। दीक्षार्थ भक्तजनांसी ॥ २९ ॥

गद्यरुप :

तिचे बोलणे ऐकून दत्त आपण प्रसन्न झालात. पुढे भक्त जनांना दीक्षा देण्याच्या कार्याचे प्रयोजन होते.

शब्दार्थ :
कार्याकारण=कार्य (काम) + कारण (प्रयोजन)
दीक्षार्थ=दीक्षा (आचरणाची रीत, शिक्षण) + अर्थ (हेतू)

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३०

ओवी :

म्हणे तापसी तियेसी। पुत्र होईल तुज तापसी।

उद्धरील तुझ्या वंशासी। ख्यातिवंत कलियुगीं॥ ३० ॥

गद्यरुप :

तिला तो तपस्वी म्हणाला,"तुला तपस्वी पुत्र होईल .तुझ्या वंशाचा तो उद्धार करील. कलियुगात तो कीर्तीवंत होईल."

शब्दार्थ :	
तापसी= तपस्वी= तप आचरणारा	ख्याति= कीर्ती

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३१

ओवी :

असावें तुम्हीं त्याचिया बोलीं। येऱ्हवीं न राहे तुम्हांजवळी।
ज्ञानमार्गें अतुर्बळी। तुमचें दैन्यहारक देखा॥ ३१ ॥

गद्यरुप :

"तुम्ही त्याच्या बोलण्यानुसार रहावे. तो तुमच्याजवळ रहाणार नाही. ज्ञानमार्गात तो अत्यंत श्रेष्ठ (अतिबलाढ्य) असेल. तो तुमची गरीबी निवारण करेल, हे तुम्ही पहाल."

शब्दार्थ :	
येऱ्हवी= (येर= तो)	अतुर्बळी= अतिबलाढ्य
दैन्यहारक=दैन्य (दीन= गरीब स्थिती)+हारक (निवारण करणारा)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३२

ओवी :

इतुकें सांगोनि तापसी। अदृश्य झाला परियेसीं।
विस्मय करीतसे मानसीं । विप्रवनिता तये वेळीं॥ ३२ ॥

गद्यरुप :

इतके सांगून तो तपस्वी अदृश्य झाला हे ऐका. त्यावेळी ब्राह्मण स्त्रीला मनांत आश्चर्य वाटले.

शब्दार्थ :		
तापसी= तपस्वी= तप आचरणारा	अदृश्य= न दिसेसा	परियसणे= ऐकणे
विस्मय= आश्चर्य	विप्रवनिता=विप्र(ब्राह्मण) +वनिता(स्त्री)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३३

ओवी :

विस्मय करोनि घरांत। पतीसी सांगे वृत्तांत।
दोघे हर्षनिर्भर होत। म्हणती होईल दत्तात्रेय॥ ३३ ॥

गद्यरुप :

विस्मयचकित झालेली ब्राह्मण स्त्री घरात आली व तिने आपल्या पतीला सर्व वृतांत सांगितला दोघेही अति आनंदित होऊन म्हणू लागले की पुत्र म्हणून दत्तात्रेय जन्मास येणार.

शब्दार्थ :	
विस्मय= आश्चर्य	वृत्तांत= हकिकत
हर्षनिर्भर= हर्ष(अतिशय आनंद) + निर्भर (पूर्ण, अतिशय)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३४

ओवी :

माध्यान्हसमयीं अतिथिकाळीं। दत्तात्रेय येताति तये वेळीं।
विमुख न व्हावें तये काळीं। भिक्षा मात्र घालिजे॥ ३४॥

गद्यरुप :

दुपारच्यावेळी अतिथी येतात त्या वेळी दत्तात्रेयच येतात. त्यावेळी तोंड फिरवू नये ,त्यांना भिक्षा मात्र घालावी.

शब्दार्थ :	
माध्यान्हसमयी= माध्यान्ह (दुपार) + समयी (वेळी)	काळ= वेळ
विमुख=वि + मुख(तोंड)= तोंड फिरविणे (हा शब्द श्रीगुरुचरित्रकारांनी तयार केलेला वाटतो.)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३५

ओवी :

दत्तात्रेयाचें स्थान जाण। माहूर करवीर क्षेत्र खूण।
सदा वास याचि ग्रामा। पांचाळेश्वर नगरांत॥ ३५॥

गद्यरुप :

माहूर,करवीर क्षेत्र ह्या दत्तात्रेय स्थानांच्या खूणा आहेत, हे जाण. त्यांचा वास नेहमी गावांत पांचाळेश्वर नगरांत असतो.

शब्दार्थ :	
वास= राहणे वस्ती	ग्राम = गाव

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३६

ओवी :

नाना रुपें भिक्षुकवेषें । दत्तात्रेय येताति हरुषें।
न पुसतां माझ्या निरोपास । भिक्षा मात्र घालिजे॥ ३६ ॥

गद्यरुप :

भिक्षुकांच्या वेषांत नाना रुप घेऊन दत्तात्रेय येतात. मला संदेश न विचारता, तू त्यांना आनंदाने भिक्षा मात्र घालावीस."

शब्दार्थ :		
हरुषते = हर्षित = आनंदित	पुसणे =विचारणे	निरोप= संदेश

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३७

ओवी :

विप्रस्त्री म्हणे पतीसी। आजि अवज्ञा केली मीं तुम्हांसी।

ब्राह्मण न जेवितां तयासी। भिक्षा घातली म्हणतसे॥ ३७॥

गद्यरुप :

ती ब्राह्मण स्त्री पतीस म्हणाली,"मी तुमचा अनादर केला."

ब्राह्मण न जेवता मी त्यांना (अतिथी वेषातील दत्तात्रेयांना) भिक्षा घातली, असे ती म्हणत होती.

शब्दार्थ :	
विप्रस्त्री= विप्र (ब्राह्मण) + स्त्री	अवज्ञा= अनादर

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३८

ओवी :

ऐकोनि सतीचे बोल। विप्रमन संतोषलें।
म्हणे पतिव्रते भलें केलें। पितर जाहले माझे तृप्त॥ ३८॥

गद्यरुप :

हे त्या सतीचे बोलणे ऐकून ब्राह्मणाचे मन समाधानी झाले. तो म्हणाला," हे पतिव्रते तू भले केलेस.माझे पूर्वज तृप्त झाले."

शब्दार्थ :	
पितर= पूर्वज	तृप्त= संतुष्ट= तृप्त, समाधानी

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ३९

ओवी :

करूनि कर्म पितरांचे नामीं। समर्पावें विष्णूसी आम्हीं।
साक्षात्कारें आपण येऊनि। भिक्षा केली आम्हां घरीं॥ ३९ ॥

गद्यरुप :

पूर्वजांच्या नावाने कर्म करुन विष्णूस आम्हीं अर्पण करावे. साक्षात आपण (विष्णू = दत्त) आमच्या घरी येऊन (वर) दान दिलेत.

शब्दार्थ :		
पितर= पूर्वज	नाम=नाव	समर्पिणे = अर्पण करणे
साक्षात्कार= प्रत्यक्षता	भिक्षा= दान	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४०

ओवी :

कृतार्थ झाले पितृ समस्त । निर्धारें झाले स्वर्गस्थ।
साक्षात् विष्णु भेटला दत्त। त्रयमूर्ति-अवतार॥ ४० ॥

गद्यरुप :

आमच्या घराण्यातील वडीलधारे (पूर्वज) कृतार्थ झाले, ते आता निश्चित स्वर्गाचे रहिवासी झाले. तीनमूर्ति अवतार दत्त रुपात साक्षात विष्णु आपण भेटलात.

शब्दार्थ :

पितृ= बाप= वडील, मोठा	निर्धारणे= निश्चित करणे	स्वर्ग= देवलोक
अवतार= स्वरुप	त्रय=तीन	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४१

ओवी :

धन्य धन्य तुझी मातापिता । जोवर लाधलीस मुख्य आतां ।
पुत्र होईल तुज निभ्रांता । न धरीं चिंता मानसीं ॥ ४१ ॥

गद्यरुप :

तुझे माता- पिता धन्य आहेत. तुला जो मुख्य वर लाभलेला आहे, त्यामुळे तुला निःसंशय पुत्र होईल, मनात चिंता करु नकोस.

शब्दार्थ :	
लाधणे = लाभणे , मिळणे	निभ्रांत= निःशंक,निःसंशय

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४२

ओवी :

हर्षें निर्भर होवोनि । राहिली दोघें निश्चिंत मनीं ।

वर्ततां जाहली अंतर्वनी । विप्रस्त्री परियेसा ॥ ४२॥

गद्यरुप : .

अतिशय आनंदित होऊन दोघे मनाने निश्चिंत झाले. ती ब्राह्मणस्त्री गरोदर राहिली, ही गोष्ट झाली हे ऐका.

शब्दार्थ :		
निर्भर= अतिशय	अंतर्वनी(अंतर्वत्नी =गर्भिणी)	वर्त= गोष्ट
हर्ष= अतिशय आनंद	परियसणे= ऐकणे	विप्रस्त्री= विप्र (ब्राह्मण)+ स्त्री

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४३

ओवी :

ऐसे नव मास क्रमोनि । प्रसूत जाहली शुभदिनीं ।
विप्रें स्नान करूनि। केलें जातकर्म तये वेळीं ॥४३॥

गद्यरुप :

असे नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर, एका शुभदिवशी ती प्रसूत झाली, त्यावेळी ब्राह्मणाने आंघोळ करुन जातकर्म केले.

शब्दार्थ :		
नव मास= नव(नऊ) + मास (महिना)	प्रसूत= बाळंत	विप्र=ब्राह्मण
स्नान= आंघोळ	जातकर्म= सोळा संस्कारांपैकी एक संस्कार (मूल जन्मताक्षणी केला जाणारा संस्कार)	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४४

ओवी :

मिळवोनि समस्त विप्रकुळी । जातक वर्तविती तये वेळीं।
म्हणती तपस्वी होईल बळी । दिक्षाकर्ता जगद्गुरु ॥४४॥

गद्यरुप :

सर्व ब्राह्मणकुळे ('आपळराज' ह्या ब्राह्मणाकडे) एकत्र आली त्यावेळी नवजात बाळाचे ज्योतिष ज्योतिषशास्त्राच्या सहाय्याने भविष्यविषयक अनुमान सांगू लागले. तपस्वी म्हणू लागले, "हा पुत्र शिक्षणकर्ता जगत् गुरु म्हणुन बलवान श्रेष्ठ होईल.

शब्दार्थ :		
विप्रकुळ= ब्राह्मणकुळ	तपस्वी=तप आचरणारा	बळी= बलवान पुरुष
दिक्षाकर्ता=दिक्षा (शिक्षण) + कर्ता (करणारा)	जगद्गुरु= जगत् गुरु = जगाचा गुरु	
जातक= जन्मकाळच्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाच्या आयुष्यात घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींविषयींचे वर्णन करणारा ज्योतिषशास्त्राचा एक विषय.		

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४५

ओवी :

ऐकोनि म्हणती मातापिता । हो कां आमुचा कुळ उद्धरिता ।
आम्हांसी वर दिधला दत्ता । म्हणोनि ठेविलें तया नांव ॥ ४५ ॥

गद्यरुप :

हे ऐकून मातापिता म्हणू लागले की आमच्या कुळांचा उद्धार करणारा आहे, का हो ? आम्हाला श्रीदत्ताने वर दिलेला आहे, म्हणून त्याचे नांव ठेवले.

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४६

ओवी :

'श्रीपाद' म्हणोनि याकारणें । नाम ठेविलें तया ब्राह्मणें ।
अवतार केला त्रैमूर्ति आपण । भक्तजन तारावया ॥४६॥

गद्यरुप :

याकारणाने त्या ब्राह्मणाने 'श्रीपाद' म्हणून नाव ठेवले. भक्तांचे रक्षण करण्यासाठी त्रैमूर्ति आपण अवतार घेतला.

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४७

ओवी :

वर्तत असतां त्याचे घरीं । झाला सात संवस्तरीं ।
मुंजीबंधन ते अवसरीं । करिता झाला द्विजोत्तम ॥४७॥

गद्यरुप :

त्याच्या घरी वाढत असताना तो सात वर्षांचा झाला. त्याच्या मुंजीबंधनाचा कार्यक्रम (प्रसंग) होऊन तो ब्राह्मणश्रेष्ठ केला गेला.

शब्दार्थ :		
वर्तणे= चालू असणे	संवस्तर= वर्ष	अवसर= प्रसंग
द्विजोत्तम= द्विज (ब्राह्मण) + उत्तम (श्रेष्ठ)		
मुंज= उपनयनसंस्कार= वेदाधिकार प्राप्त करून घेण्याच्या वेळचा संस्कार		

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४८

ओवी :

बांधितां मुंजी ब्रह्मचारी । म्हणता झाला वेद चारी ।
मीमांसा तर्क अतिविस्तारीं । म्हणों लागला तये वेळीं ॥४८॥

गद्यरुप :

मुंजीबंधनाने तो ब्रह्मचारी झाला. त्याने चारही वेद म्हणुन दाखविले त्यावेळी मीमांसा, तर्क अतिविस्ताराने म्हणू लागला.

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ४९

ओवी :

ऐकोनि समस्त नगरलोक । विस्मय करिती सकळिक ।
होईल अवतार कारणिक। म्हणोनि बोलती आपणांत॥ ४९ ॥

गद्यरुप :

ते ऐकून सर्व नगरवासी लोक आश्चर्य करु लागले. हा अवतार होईल, अशा कारणाने आप आपसात बोलू लागले.

शब्दार्थ :	
विस्मय= आश्चर्य	सकळिक= सर्व

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५०

ओवी :

आचार-व्यवहार-प्रायश्चित्त ।समस्तांसी आपण बोलत ।
वेदांतभाष्य वेदार्थ । सांगता झाला द्विजवरांसी ॥५०॥

गद्यरुप :

आचार, व्यवहार व प्रायश्चित ह्या विषयांवर आपण (श्रीपाद) सगळ्यांना सांगू लागलात.वेदान्तावर भाष्य करुन वेदार्थ ब्राह्मणश्रेष्ठाना सांगू लागला.

शब्दार्थ :
भाष्य= विवरण

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५१

ओवी :

वर्ततां ऐसें परियेसी । झाला संवत्सर षोडशी ।

विवाह करूं म्हणती पुत्रासी । मातापिता अवधारा ॥५१॥

गद्यरुप :

असे चालू असताना सोळा वर्षे झाली. मातापिता निश्चयपूर्वक पुत्राला म्हणू लागले, "तुझा विवाह करु".

शब्दार्थ :		
वर्तणे= चालू असणे	परियसणे= ऐकणे	संवत्सर=वर्ष
षोडश= सोळा	अवधारणे= निश्चय करणे	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५२

ओवी :

विचार करिती पुत्रासवें । बा रे विवाह तुज करावें ।
श्रीपाद म्हणे ऐका भावें । माझी वांछा सांगेन ॥५२॥

गद्यरुप :

मातापिता विचार करुन पुनः पुत्राला म्हणाले,"बाबा रे, तुझा विवाह करु या." श्रीपाद म्हणाला ,"माझी इच्छा अंतःकरणापासून सांगतो, ती ऐका."

शब्दार्थ :		
भाव= अंतःकरणाची स्थिती	वांछा= इच्छा	सवे= पुनः

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५३

ओवी :

कराल विवाह मज तुम्ही । सांगेन ऐका, विचारिलें आम्ही ।
वैराग्यस्त्री असे नेमी । काम्य आमुचें तेथे असे ॥५३॥

गद्यरुप :

तुम्ही माझा विवाह करायचा म्हणून आम्हाला विचारत आहात, तर मी सांगीन ते ऐका,"वैराग्यस्त्री हिच आमची नेमस्त (वधू) आहे. तिच (विरक्ती) इच्छा आम्ही धरलेली आहे ."

शब्दार्थ :	
नेम= खूण	काम्य = इच्छा धरुन केलेले

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५४

ओवी :

ते स्त्रियेवांचूनि आणीक नारी । समस्त जाणा मातेसरी ।
जरी आणाल ते सुंदरी । वरूं म्हणती तये वेळीं ॥५४॥

गद्यरुप :

जरी तुम्ही सुंदर स्त्री आणली व तिला स्वीकार (लग्न कर) म्हणालात तरी त्यावेळी त्या (वैराग्य स्त्री)स्त्री शिवाय आणखी दुसऱ्या सर्व स्त्रिया आम्हाला मातेसमान आहेत हे जाणा.

शब्दार्थ :		
नारी= स्त्री	सरी= बरोबर	वरणे= पसंत करणे, स्वीकारणे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५५

ओवी :

आपण तापसी ब्रह्मचारी । योगश्रियावांचोनि नारी ।

नलगती हा बोल धरा निर्धारीं । 'श्रियावल्लभ' नाम माझें ॥ ५५॥

गद्यरुप :

मी तापसी, ब्रह्मचारी आहे. योग - लक्ष्मी शिवाय मला दुसरी स्त्री चालत नाही, हे निश्चित समजा. 'श्रियावल्लभ ' माझे नाव आहे.

शब्दार्थ :		
श्रिया= लक्ष्मी	निर्धार= निश्चय नियम	वल्लभ = पती

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५६

ओवी :

‘श्रीपाद – वल्लभ’ ऐसें । नाम झालें त्रिमूर्ति कैसें ।
पितयातें म्हणतसे । जाऊं उत्तरपंथासी ॥ ५६ ॥

गद्यरुप :

‘श्रीपाद –वल्लभ’ असे नाव त्रिमूर्तिचे कसे झाले ? पित्याला म्हणाले, “मी पुढील मार्गाला जातो.”

शब्दार्थ :	
उत्तर= पुढला	पंथ=मार्ग

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५७

ओवी :

ऐकोनि पुत्राचें वचन । आठव जाहलें पूर्वील सूचन ।
भिक्षुकें सांगितलें निर्गुण । सत्य झालें म्हणतसे ॥ ५७॥

गद्यरुप :

पुत्राचे बोलणे ऐकून पूर्वीची सुचना (मातापित्याला) आठवली. भिक्षुकाने सांगितले होते, तुझा पुत्र निर्गुण (परमात्मा) असेल. ते सत्य झाले, असे म्हणाले.

शब्दार्थ :
निर्गुण = सत्त्व, रज, तम आदी गुणरहित = परमात्मा

॥श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५८

ओवी :

आतां याचिया बोलासी । मोडा घालितां परियेसीं ।

विघ्न होईल भरंवसी । म्हणोनि विचारिती तये वेळीं ॥५८॥

गद्यरुप :

आता त्याच्या बोलण्याला मोडता घातला तर भरंवशाने (निश्चित) अडचणीचे होईल, म्हणून त्यावेळी ते विचार करु लागले, हे ऐका.

शब्दार्थ :	
मोडा= प्रतिबंध, हरकत	परियसणे= ऐकणे
विघ्न = प्रतिबंध, अडचण	भरंवसा= विश्वास

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ५९

ओवी :

न म्हणावें पुत्र यासी ।अवतारपुरुष तापसी ।
जैसें याचे वसे मानसीं । तैसे करावें म्हणती मातापिता ॥५९॥

गद्यरुप :

ह्याला पुत्र म्हणू नाही, हा तापसी (तप आचरणारा) अवतार पुरुष दिसतो. ह्याच्या मनात जसे आहे, तसेच करु द्यावे असे माता पिता म्हणू लागले.

शब्दार्थ :
तापसी= तपस्वी= तप आचरणारा

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६०

ओवी :

निश्चय करुनि आपुले मनीं । पुत्रासी म्हणती जनकजननी ।
होतों आशाबद्ध होऊनि । प्रतिपाळिसी म्हणोनियां ॥ ६० ॥

गद्यरुप :

आपल्या मनाशी निश्चय करुन मातापिता पुत्रास म्हणू लागले,"तू आम्हाला सांभाळशील (आमचा प्रतिपाळ करशील), अशा आशेत आम्ही अडकलेलो होतो."

शब्दार्थ :		
जनक= बाप	जननी= आई, माता	बद्ध= बांधलेला, अडकलेला
प्रतिपाळ= संरक्षण		

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६१

ओवी :

ऐसें मनीं व्याकुळित । डोळां निघती अश्रुपात ।

माता पडली मूर्च्छागत । पुत्रस्नेहेंकरोनियां ॥ ६१ ॥

गद्यरुप :

अशी मनाने विव्हळ झाल्याने डोळ्यात जमा झालेले अश्रू डोळ्याबाहेर वाहू लागले. पुत्र प्रेमापोटी माता मूर्च्छित पडली.

शब्दार्थ :		
व्याकुळ= विव्हळ	अश्रु= असू ,डोळ्यातले पाणी	पातणे= ये ऊन पोचणे
मूर्च्छागत= मूर्च्छित	स्नेह= प्रेम	करणे= आचरणे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६२

ओवी :

देखोनि मातेचें दुःख । संबोखीतसे परमपुरुष ।
उठवूनि आपुल्या करकमळिकें ।अश्रुपात पुसतसे॥ ६२॥

गद्यरुप :

आईचे दु:ख पाहून तो परमश्रेष्ठ पुरुष तिला समजावू लागला. आपल्या हाताने त्याने तिला उठवून, तिचे डोळ्यात जमा होणारे (त्याने) अश्रू पुसले.

शब्दार्थ :	
माता=आई	संबोखणे= समजावणे असावे
परम= अत्युच्च उत्कृष्ट (श्रेष्ट)	करकमळ= कर= हात +कमळ=(हाताचा पंजा)

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६३

ओवी :

अवो माते न करीं चिंता । जें जें वांछिसी तें देईन आतां ।

दृढ करुनियां चित्ता । रहा सुखें नांदत ॥ ६३ ॥

गद्यरुप :

तो म्हणू लागला,” हे माते ,तू काळजी करु नकोस. तू जे जे इच्छित असशील. ते मी तुला आतां देईन. मन घट्ट करुन तू सुखाने रहा.”

शब्दार्थ :		
चिंता= काळजी	वांच्छा= इच्छा	दृढ= पक्के
चित्त= मन	नांदणे = रहाणे	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६४

ओवी :

बा रे तुजकरितां आपण। दुःख विसरलें अंतःकरण ।
रक्षिसी आम्हां म्हातारपणीं । दैन्यावेगळें करिसी म्हणोनि ॥६४॥

गद्यरुप :

ती माता म्हणू लागली,"बाबारे, तू म्हातारपणी आम्हाला सांभाळशील.आमचे दारिद्र्य दूर करशील, म्हणून तुझ्याकरिता आम्ही मनातील दु:ख विसरलो."

शब्दार्थ :	
अंतःकरण=मन	रक्षणे= सांभाळणे
दैन्यावेगळ= दैन्य= दीन (गरीब) स्थिती + वेगळा (संस्कृत विगल् विशेषण) निराळा, पृथक	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६५

ओवी :

पुत्र असती आपणा दोन । पाय पांगुळ अक्षहीन ।
त्यांतें पोसावें आतां कवणें । आमुतें कोण रक्षील ॥६५॥

गद्यरुप :

आम्हाला पायाने पांगळा असलेला व डोळा नसलेला आंधळा असे दोन मुलगे आहेत. आता त्यांचा सांभाळ कोण करील ? आमचे रक्षण कोण करील? “

शब्दार्थ :		
पांगुळ= पांगळा	पोसणे = पोषणे= सांभाळ करणे	कवण= कोण
अक्षहीन=अक्ष (संस्कृत अक्षिन्=डोळा)+हीन(विरहीत)= आंधळा		

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६६

ओवी :

ऐकोनि जननीचें वचन । अवलोकीतसे अमृतनयनें ।
पुत्र दोघे जाहले सगुण । आली दृष्टिचरणादिक ॥ ६६ ॥

गद्यरुप :

आपल्या आईचे बोलणे ऐकून त्याने सरळ डोळ्याने (नजरेने) पाहिले. त्या दोन्ही मुलांना पाय आदि लक्षणांसहित दृष्टि आली.

शब्दार्थ :		
अवलोकणे= पाहणे	अमृतनयन= अमृत (सुधा= सरळ + नयन (डोळा)	
सगुण= स+ गुण (लक्षण)= लक्षणांसहित	दृष्टि= डोळा	चरण= पाय

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६७

ओवी :

जैसा चिंतामणि-स्पर्शें । लोखंड होय सुवर्णासरिसें ।
तैसे महात्मदृष्टि-वर्षें । योग्यता आली तत्काळीं ॥ ६७ ॥

गद्यरुप :

जसे चिंतामणीच्या स्पर्शाने लोखंड सोन्यासारखे होते, तसे महात्म्याच्या दृष्टी वर्षावाने तत्काळ ते लायक झाले.

शब्दार्थ :		
सुवर्ण= सोने	सरिसे= सारखे	योग्यता=

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६८

ओवी :

वेदशास्त्रादि व्याकरण । सर्व म्हणती तत्क्षण ।
दोघे येऊनि लागती चरणा । कृतार्थ झालों म्हणोनियां ॥ ६८॥

गद्यरुप :

त्या क्षणी वेदशास्त्र, व्याकरण वगैरे सर्व म्हणू लागले. कृतार्थ झालो, असे म्हणून ते दोघे (श्रीपाद वल्लभांच्या) पाया पडले.

शब्दार्थ :
चरण= पाय

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ६९

ओवी :

आश्वासून तये वेळीं । दिधला वरु तत्काळीं ।
पुत्रपौत्रादीं नांदाल प्रबळीं । श्रियायुक्त सनातन ॥ ६९ ॥

गद्यरुप :

त्यावेळी त्यांना वचन दिले, "मुला ,नातवंडासह बलिष्ठ लक्ष्मीयुक्त जीवन तुम्हाला शाश्वत लाभेल."

शब्दार्थ :		
पुत्र= मुलगा	पौत्र= मुलाचा मुलगा= नातू	प्रबळ= बलिष्ठ
श्रिया=लक्ष्मी= द्रव्य	आश्वासन= वचन	सनातन = शाश्वत, चिरकाल

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७०

ओवी :

सेवा कराल जनकजननी । पावाल सुख महाज्ञानी ।

इह सौख्य पावोनि । व्हाल मुक्त हें निश्चित ॥ ७० ॥

गद्यरुप :

"तुम्ही माता पित्याची सेवा कराल, तर महाज्ञानी होऊन तुम्हाला सुख मिळेल. इहलोकीचे सुख मिळून तुम्ही निश्चित मुक्त व्हाल."

शब्दार्थ :	
जनकजननी= जनक (पिता) +जननी(माता)	पावणे =मिळणे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन)   ओवी क्रमांक ७१

ओवी :

ऐसें बोलोनि तयांसी । संबोखितसे मातेसी ।
पाहोनि दोघां पुत्रांसी । राहतां सौख्य पावाल ॥७१॥

गद्यरुप :

त्यांना असे बोलून त्यांनी मातेची समजूत घातली ,"दोन्ही पुत्रांबरोबर रहाल तर तुम्हाला सुख लाभेल."

शब्दार्थ :
संबोखवणे= समजावणे असावे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७२

ओवी :

पुत्र दोघे शतायुषी । निर्धार धरीं वो मानसीं ।
कन्या पुत्र होतील त्यांसी । पौत्रपुत्र पहाल नयनीं ॥७२॥

गद्यरुप :

दोघे पुत्र शतायुषी होतील ,अशी मनाशी खात्री बाळगावी. त्यांना कन्या व पुत्र होतील. तुम्ही पणतू (नातवांचे पुत्र)पहाल.

शब्दार्थ :
शतायुष= शत (शंभर) + आयुष (आयुष्य =जीवीतकाळ, उमर)
नयन= डोळा

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७३

ओवी :

अखंड लक्ष्मी यांचे घरीं । यांचें वंश-पारंपरी ।
कीर्तिवंत सचराचरीं । संपन्न होतील वेदशास्त्रीं ॥ ७३ ॥

गद्यरुप :

यांचे (मुलांच्या)घरी वंश परंपरेने लक्ष्मीचा अखंड वास राहिल. (श्रीमंती प्राप्त होईल). सर्व चराचरामध्ये कीर्तिवंत वेदशास्त्री म्हणून संपन्न होतील.

शब्दार्थ :
पारंपरी (पारंपारिक =परंपरेतील)
सचराचर=स +चर (हलणारे= सजीव) + अचर (न हलणारे=निर्जीव) = सजीव आणि निर्जीव दोन्ही प्रकारचे

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७४

ओवी :

आमची अवज्ञा न करितां । निरोप द्यावा अवो माता ।
जाणें असे उत्तरपंथा ।दीक्षा देणें साधुजनां ॥ ७४ ॥

गद्यरुप :

हे माते, आमचा तिरस्कार न करिता आम्हाला जाण्याविषयी आज्ञा द्यावी. साधुलोकांना आचरणाची रीत शिकविणे, हा आमचा पुढचा मार्ग आहे.

शब्दार्थ :		
अवज्ञा =अनादर, तिरस्कार	निरोप= जाण्याविषयी आज्ञा	अवो= हे
उत्तरपंथ=उत्तर (पुढला) + पंथ (मार्ग, संप्रदाय)	दीक्षा= आचरणाची रीत	

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७५

ओवी :

ऐसें सांगोनि मातापित्यांसी । अदृश्य झाला परियेसीं ।
पावला त्वरित पुरी काशी । गुप्तरूपें होता तेथें ॥ ७५ ॥

गद्यरुप :

आई - वडिलांना असे सांगून अदृश्य झालात, त्वरीत काशी नगरात पोचलात, तेथे गुप्तरुपात होतात, असे ऐकले.

शब्दार्थ :	
पावणे= पोचणे	पुरी= नगरी

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७६

ओवी :

निघाला तेथूनि बदरीकानना । भेटी घेऊनि नारायणा ।
अवतार असे आपणा । कार्याकारण मनुष्यदेहीं ॥ ७६ ॥

गद्यरुप :

नारायणाची भेट घेऊन (हिमालय पर्वतावरील) बदरी अरण्यात निघालात (दिसलात). कार्य करण्याच्या हेतूने आपला मनुष्यदेहांत अवतार झालेला आहे.

शब्दार्थ :	
कानन= अरण्य, जंगल	कारण= प्रयोजन, हेतू , निमित्त, साधन

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७७

ओवी :

दीक्षा करावया साधुजनां । तीर्थें हिंडतसे आपण ।
मनोवेगें मार्गक्रमण । आले तीर्थ गोकर्णासी ॥ ७७ ॥

गद्यरुप :

साधूजनांचे शिक्षण करण्यासाठी आपण तीर्थक्षेत्रे हिंडलात. मनाच्या वेगाने मार्गक्रमण करीत गोकर्णाला आलात.

शब्दार्थ :
दीक्षा= शिक्षण

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) ओवी क्रमांक ७८

ओवी :

ऐकोनि सिद्धाचें वचन । विनवी नामधारक आपण ।
तें परिसा श्रोतेजन । म्हणे सरस्वती गंगाधरु ॥७८॥

गद्यरुप :

सिद्ध(मुनीं)चे वचन ऐकून भक्त विनवू लागला, "ते श्रोतेजन हो! तुम्ही ऐका," असे सरस्वती गंगाधर म्हणतात.

शब्दार्थ :		
परियसणे= ऐकणे	श्रोता = ऐकणारा	जन= लोक

॥ श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पांचवा (दत्तात्रेयश्रीपादावतारकथन) (ओंवीसंख्या ७८)

ओवी :

इति श्रीगुरुचरितामृते परमकथाकल्पतरौ
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे
दत्तात्रेयश्रीपादावतारकथनं नाम पंचमोऽध्याय ॥५॥
श्रीपादश्रीवल्लभनृसिंहसरस्वतीदत्तात्रेयार्पणमस्तु॥

॥ श्रीगुरुदेवदत्त॥

गद्यरुप : अशाप्रकारे श्रीगुरुचरित्र अमृतातून, कल्पतरुप्रमाणे परमकथा असणाऱ्या, श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपआख्यानातून, सिद्ध(मुनी) व नामधारक यांच्या संवादातून, दत्तात्रेयश्रीपादावतारकथन नावाचा पांचवा अध्याय श्रीपादश्रीवल्लभनृसिंहसरस्वती गुरुदत्तात्रेयाला अर्पण असो.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

शब्दार्थ : पंचम= पांच